ePaper

| वर्ष - 6 । अंक - 183 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शनिवार।दिनांक 15 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## भाजपला उद्धव ठाकरे नको तसे एकनाथ शिंदेही नकोत: प्रकाश आंबेडकर




**आतील पानांत**

- 'आप'चे मिशन पिंपरी-चिंचवड
- सह शहर अभियंतापदी महापालिकेतील अधिकाऱ्याला पदोन्नती!
- मंदीची लाट की नवी पहाट?


# पालिकेच्या 68 शिक्षण सेवकांना 'दिवाळी गिफ्ट'!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा नियमितीकरणाचा निर्णय



**भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा**

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत काम करणारे ६८ शिक्षण सेवक नियमित सेवेत घेण्यात येणार आहे. त्यामुळे ३ वर्षे सेवाकाळ पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना आयुष्यभरासाठी "दिवाळी गिफ्ट" मिळाले आहे. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी शिक्षण सेवकांना न्याय मिळवून देण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत कार्यरत ७८ प्राथमिक शिक्षण सेवकांपैकी ६८ शिक्षण सेवकांचा तीन वर्षे कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण झालेला आहे. शासन निर्णयानुसार, केवळ ६ हजार रुपये तुटपुंज्या मानधनावर संबंधित शिक्षण सेवकांनी सेवा बजावली आहे. दि. १७ सप्टेंबर २०२२ अखेर बहुतेक सर्वच शिक्षण सेवकांचा सेवा कालावधी पूर्ण झाल्याने आता त्यांना मिळणारे मानधनही बंद होणार आहे. त्यामुळे संबंधित शिक्षण सेवकांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे पदवीधर शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शमनोज मराठे यांनी शिक्षण सेवकांना नियमिततेचे आदेश विनाविलंब मिळावेत यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू केला होता.

दरम्यान, दि.२७ सप्टेंबर २०२२ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील , उप आयुक्त श्री. खोत, प्रशासन अधिकारी श्री.नाईकडे यांची भेट घेऊन शिक्षण सेवकांना नियमित वेतन श्रेणीचे आदेश तातडीने मिळावेत. यासाठी चर्चा केली केली होती. आमदार लांडगे यांनी स्वतः पाठपुरावा करून संबंधित शिक्षण सेवकांची मागणी प्रशासनाकडे लावून धरली, अशी माहिती मनोज मराठे यांनी दिली.

> पदवीधर शिक्षक संघटनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने शिक्षण सेवकांना दिवाळी पूर्व नियमिततेचे आदेश देण्यास प्रशासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे निश्चितच ६८ शिक्षण सेवकांची दिवाळी गोड होणार आहे.
>
> - **मनोज मराठे,** राज्य सचिव, महाराष्ट्र राज्य पदवीधर' प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा.

### शिक्षण सेवकांना नियानुसार कायम करणार!

महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे- पाटील म्हणाले की, महापालिका शिक्षण विभाग अंतर्गत एकूण ७८ शिक्षण सेवकांचा तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे त्यापैकी ६८ शिक्षकांच्या निर्मिती करण्याचे आदेश काढले असून, उर्वरित शिक्षण सेवक कागदोपत्री पूर्तता करून नियमित करण्यात येणार आहेत.

# डॉ. प्रकाश आंबेडकर यांची तोफ आज धडाडणार!

## पिंपरीतील एच. ए. मैदानावर आज सभा : समर्थकांची जोरदार तयारी

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शनिवारी (दि.15) पिंपरी येथील एच.ए. च्या मैदानात ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा धम्म मेळावा पार पडणार आहे. यासाठी तयारी करण्यात येत आहे. या सभेतून प्रकाश आंबेडकर जनतेशी संवाद साधणार आहेत. या धम्म मेळाव्यात भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर, अंजली आंबेडकर, बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर, रेखा ठाकूर, अशोक सोनोने आदी उपस्थित राहणार आहेत. भारतीय बौद्ध महासभा, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व बौद्ध समाज विकास महासंघाच्या वतीने या धम्म मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे. भारीपचे माजी शहराध्यक्ष अतुल बहुले यांच्या नेतृत्वाखाली भव्य दिव्य धम्म रॅली सुद्धा आयोजित करण्यात आली आहे.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या धम्म बाईक रॅलीसाठी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातील अनुयायी महात्मा फुले वाडा येथे एकत्र जमतील. त्यानंतर आण्णाभाऊ साठे पुतळा सारसबाग, स्वारगेट, बसवेश्वर महाराज पुतळा बाजीराव रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा शिवाजीनगर मार्गे संचेती हॉस्पिटल चौक, संगमवाडी ब्रिज दापोडी, पुणे मुंबई जुना हायवे, भगतसिंग पुतळा बोपोडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी इथून महात्मा फुले पुतळा पिंपरी व एच ए मैदान इथे या रॅलीचा समारोप होणार आहे.

### धम्म बाईक रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन...

**नितीन शेलार, नवनीत अहिरे, अजित पानसरे, संदीप चौधरी, अजित वाघमारे, भुषण भवर, सचिन शिंदे, ओंकार कांबळे, नितीन कांबळे हे या धम्म बाईक रॅलीच्या जय्यत तयारीसाठी मेहनत घेत आहेत. तसंच या भव्य धम्म बाईक रॅलीमध्ये जास्तीत जास्त अनुयायींनी सहभागी होऊन पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून व पंचशील ध्वज घेऊन उपस्थित रहावे. तसेच रॅलीसाठी दुचाकी व चारचाकी वाहनासह शनिवारी (दि.15) दुपारी दोन वाजता उपस्थित रहावे असं देखील आवाहन करण्यात आले आहे.**

# ‘आप’चे मिशन पिंपरी-चिंचवड!

## संघटनात्मक बांधणीवर भर : जाधववाडीतील अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम आदमी पार्टीच्या जाधववाडी प्रभागातील कार्यकर्त्या सिताताई केंद्रे यांच्या नेतृत्वात आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य संघटक विजय कुंभार यांच्या हस्ते बहुसंख्य महिला व पुरूष कार्यकर्त्यांचा आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश करण्यात आला.**




चिखली परिसरातील तुकाराम इंगोले, अंकुश कवटकर, साईनाथ इंगोले, गजानन इंगोले, गुलाब हंबर्डे ,शिवराज इंगोले, वैभव इंगोले, विठ्ठल सावंत, ओम डांगे, विष्णू काळे, प्रभाकर इंगोले ,विष्णू घोरबांड, पांडुरंग कवटकर ,वैभव कौशल्य, राज कांगणे, सुरेखा कांगणे कौशल्या कळसाईत, मिरा शिखरे, संजय कडोळकर, गोरख पिंपळे, छाया वावरे मेघा गरिबे, मथुरा देशमुख, हौसाबाई कोपनर, सुलोचना उबाळे,मंदा गोरे,शालन पवार, आदी महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी प्रवेश केले.

यावेळी आम आदमी पार्टीचे संपर्कप्रमुख वैजनाथ शिरसाठ, आप प्रवक्ते प्रकाश हगवणे, आप युवा नेते डॉक्टर अमर डोंगरे, राहुल धोत्रे सुनील शिवशरण, कमलेश रणवरे, माया सांगवे, ब्रह्मानंद जाधव, सुरेश भिसे, आजिनाथ सकट, सुरेश बावनकर,आपचे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### ...यासाठी केला आपमध्ये प्रवेश

बहुसंख्य कार्यकर्त्यांच्या प्रवेशानंतर काही कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. त्यावेळी त्यांनी म्हटले देशामध्ये प्रचंड महागाई वाढली आहे पेट्रोल डिझेल गॅस सीएनजी खाद्यतेल महाग झाले आहे. अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली आणि पंजाब या ठिकाणी जनतेला चांगल्या सुविधा दिल्या आहेत वीज शिक्षण पाणी शाळा यावरती मोठा भर दिला आहे त्यामुळे आम्ही आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. ळांचे फार्स करुन सोसायटीधारक पिंपरी-चिंचवडकरांना काय मिळाले? हा प्रश्न अनुत्तरित राहीला आहे.

# देशात १८ कोटींहून अधिक लोक निरक्षर

## केंद्राच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी

।पुणे। महाईन्यूज ।

सध्या देशात १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील १८ कोटींहून अधिक लोक निरक्षर असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवभारत साक्षरता कार्यक्रम १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबवला जाणार असून, राज्य स्तरावर राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणामार्फत योजना राबवली जाईल. ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाने नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. २०११च्या जनगणनेनुसार देशात १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील २५.७६ कोटी लोक निरक्षर होते. २००९-१० ते २०१७-१८ या दरम्यान राबवलेल्या साक्षर भारत कार्यक्रमाअंतर्गत ७.६४ कोटी लोक साक्षर झाले. मात्र अजूनही १८ कोटींहून अधिक लोक निरक्षर असल्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर २०३०पर्यंत शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवभारत साक्षरता कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, महत्त्वपूर्ण जीवनकौशल्ये, व्यावसायिक कौशल्य विकास, मुलभूत शिक्षण आणि निरंतर शिक्षण हे या योजनेचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. १५ ते ३५ या वयोगटातील लोकांना प्राधान्याने साक्षर करून त्यानंतर ३५ वर्षांवरील लोकांचा समावेश केला जाईल. योजनेत समतुल्य तयारी स्तर (तिसरी ते पाचवी), मध्य स्तर (सहावी ते आठवी), माध्यमिक स्तर (नववी ते बारावी) राष्ट्रीय आणि राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षण संस्था (एनआयओएस) यांच्या सहकार्याने राबवला जाईल.

इयत्ता पाचवी आणि त्यावरील विद्यार्थी त्यांच्या स्वत:च्या कुटुंबातील निरक्षरांना साक्षर होण्यासाठी मदत करतील. तर शिक्षक पदाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी यांचा योजनेमध्ये स्वयंसेवक म्हणून समावेश असेल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी शाळा हे एकक असेल. तसेच ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. त्यामुळे टीव्ही, रेडिओ, मोबाइलद्वारे पाठ्यक्रम उपलब्ध करून दिला जाईल. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, मार्गदर्शन कार्यशाळा प्रत्यक्ष स्वरुपात घेता येतील. योजनेअंतर्गत लाभार्थी आणि स्वयंसेवी शिक्षक यांचे सर्वेक्षण करण्यात येईल.



### स्वयंसेवकांना मानधन नाही

योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्राकडून साठ टक्के आणि राज्याकडून साठ टक्के निधी दिला जाईल. तर स्वयंसेवक म्हणून काम करणाऱ्यांना कोणतेही वेतन किंवा मासिक मानधन दिले जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# ‘वीस पटसंख्या असलेल्या शाळा बंद करू नका’

## पुण्यातील मावळात पालकांचे पाल्यासह आंदोलन



।पुणे। महाईन्यूज ।

राज्यातील वीस पटसंख्येच्या आतील शाळा बंद करण्याच्या हालचाली सरकारकडून सुरू आहेत. शिंदे- फडणवीस सरकारच्या या धोरणाविरोधात वाड्या, वस्ती आणि ग्रामीण भागातील पालकांनी नाराजी व्यक्त केली असून सरकारच्या विरोधात आंदोलन सुरू केलं आहे. पुण्यातील मावळ परिसरात आदिवासी बांधव राहतात. अशा ठिकाणी वीस पटसंख्या असलेल्या शाळा आहेत. त्यामुळं राज्यसरकारच्या धोरणाविरोधात आदिवासी बांधवांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. स्थानिक आमदार सुनील शेळके यांनी देखील विरोध दर्शविला आहे. मावळमधील कोथुर्रने, वाघजाई वस्ती येथे पालकांनी पाल्यासह आंदोलन केलं. आदिवासी पालक मोलमजुरी करून मुलांना शिकवत आहेत. आमच्यावर जी वेळ आली आहे, ती मुलांवर येऊ नये अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे. राज्यसरकारने धोरणात बदल न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पालकांनी दिला आहे.

मावळचे आमदार सुनील शेळके यांनी देखील अनेक प्रश्न उपस्थित करत शाळा बंद करू नयेत असं म्हटलं आहे. वाड्या, वस्ती येथील वीस पटा खालील शाळा बंद करू नयेत. शहरात किंवा दूरवर चा प्रवास करून मुलांना शिक्षण घ्यावं लागेल. याच नियोजन सरकार करणार का? गरिबी परिस्थिती असल्याने शिक्षणापासून मुलं वंचित राहतील असं आमदार शेळके म्हणाले आहेत.

# सह शहर अभियंतापदी महापालिकेतील अधिकाऱ्याला पदोन्नती!

## आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश : मनोज सेठिया यांना संधी

**पिंपरी-चिंचवड ।।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी : पिंपरी- चिंचवड महापालिका आस्थापनेवर राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती न करता महापालिकेतील अनुभवी अधिकाऱ्यांना संधी द्यावी. या मागणीला अखेर यश मिळाले. स्थापत्य विभागाच्या सह शहर अभियंतापदी मनोज सेठिया यांची नियुक्ती करण्यात आली.**



भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेतील महत्वाच्या पदांवर राज्य शासनाचे अधिकारी नियुक्त न करता महापालिका प्रशासनातील अनुभवी अधिकाऱ्यांना पदोन्नतीद्वारे संधी द्यावी, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती. तसेच, महापालिका प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांनाही पत्राद्वारे सूचित केले होते.

आमदार लांडगे यांच्या मागणीची दाखल घेत महापालिका प्राशसनाने स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज सेठिया यांना सह शहर अभियंतपदी पदोन्नती दिली आहे. त्यानुसार कामकाज वाटपाचे आदेशही निर्गमीत करण्यात आले आहेत.

पिंपरी- चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'सह शहर अभियंता' (स्थापत्य विभाग) अभिनामाची पदे शासन मंजूर असून, रिक्त पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि. १२ ऑक्टोबर रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित केली होती. या सभेत पदोन्नतीच्या निर्णयाला मान्यता देण्यात आली आणि गुरुवारी शेखर सिंह पदोन्नतीचे आदेश काढले.

### अनुभवी अधिकाऱ्यांचा शहर विकसात फायदा : आमदार लांडगे

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरातील विकासप्रकल्प आणि विविध योजना गतीमान करण्यासाठी शहरातील संपूर्ण माहिती असलेला अनुभवी अधिकारी महत्त्वाच्या पदावर असल्यास शहराच्या हिताचे ठरणार आहे. त्यामुळे “सह शहर अभियंता” या पदासाठी महापालिकेतील अधिकाऱ्याला पदोन्नती मिळावी, अशी आमची मागणी होती. वास्तविक, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात महापालिकेत राज्य शासन नियुक्त अधिकारी विरुद्ध महापालिका अधिकारी असा अप्रत्यक्ष संघर्ष निर्माण झाला होता. त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांमध्ये काहीशी नाराजी होती. आता महापालिकेतील अधिकाऱ्याला सेवाज्येष्ठतेनुसार संधी देण्यात आली. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो.

---

# लोकाभिमूख कारभाराचा संकल्प!

## अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप : योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**विकासात्मकदृष्ट्या शहरी भागात आवश्यक असलेल्या सकारात्मक परिणामांच्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागाशी संबंधित उपक्रम, योजना, प्रकल्प तसेच विशेष कार्य आदींबाबतची माहिती अचूक आणि पारदर्शकपणे विविध माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी दिले.**



शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध उपक्रम आणि योजना राबविल्या जात आहेत. पिंपरी-चिंचवड शहराला स्मार्ट सिटी बनविण्याच्या दृष्टीने सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांच्या दैनंदिन जीवनमानावर दुरगामी व सकारात्मक परिणाम करणा-या शाश्वत विकासाची प्रक्रिया उत्तम प्रकारे राबविण्यासाठी महापालिका सात्यत्याने प्रयत्न करीत आहे. याकामी महापालिकेमार्फत शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. अर्बन फ्रेमवर्क आऊटकम्स २०२२ च्या अनुषंगाने आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते वाहतूक, स्वच्छता, सुरक्षा, पाणी व्यवस्थापन, गृहनिर्माण, शिक्षण, स्थापत्य, उद्यान, वैद्यकीय, पर्यावरण, हॉकर्स झोन आदी क्षेत्रात महापालिका राबवित असलेल्या उपक्रमांबाबत पारदर्शक आणि सर्वसमावेशक डेटाबेस तयार करून त्याद्वारे सर्व उपक्रमांबाबतची कार्यवाही तसेच प्रगती योग्य पद्धतीने नियोजन करण्याबाबत धोरण ठरविण्यासाठी विविध विभागप्रमुखांची आढावा बैठक अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.या बैठकीस अतिरिक्त सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपआयुक्त विठ्ठल जोशी, अजय चारठाणकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, शितल वाकडे, विजयकुमार थोरात, स्मार्ट सिटीचे जनसंपर्क अधिकारी सोयम अस्वार, जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध क्षेत्रीय कार्यालयांतील सहाय्यक आरोग्याधिकारी आणि स्मार्ट सिटी, स्मार्ट सारथी, फॉक्सबेरीसह विविध माध्यम समन्वयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करावा...

अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले, सर्व सेवासुविधांचा डेटाबेस अर्थात अद्ययावत माहिती महापालिकेकडे संकलित असणे आवश्यक आहे. तसेच ही माहिती सर्व शासकीय यंत्रणेस, शहरातील नागरिकांना, उद्योग क्षेत्राला विविध माध्यमांद्वारे आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे गरजेचे असते. त्यामुळे महापालिका राबवित असलेले उपक्रमांची माहितीची पारदर्शकता नागरिकांमध्ये तसेच सर्व शासकीय यंत्रणेमध्ये वाढण्यास मदत होणार आहे, असे सांगून याकामी महापालिकेच्या सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करावा, असेही जगताप म्हणाले. जेजुरीच्या दसऱ्याला 'मर्दानी दसरा' असे संबोधले जाऊ लागले.

---

# राजेश पाटील यांच्या आदेशाला आयुक्त शेखर सिंह यांची केराची टोपली

## आयुक्त शेखर सिंह आठवड्यातील तीन दिवस नागरिकांना भेटणार

**पुणे।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



महाविकास आघाडीचे राज्यातील सरकार जाऊन तेथे शिंदे-फडणवीसांचे (बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप) सरकार शंभर दिवसांपूर्वी आले. त्यांनी पूर्वीच्या सरकारने सर्व निर्णय फिरवण्याचा धडाका लावला आहे. एक, तर ते रद्द केले वा त्याला स्थगिती दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतही (PCMC) नव्या सरकारने आणलेले नवीन आयुक्त शेखरसिंह (SHEKHAR SINGH) यांनी जुने आयुक्त राजेश पाटील यांच्या नागरिकांशी संबंधित एक महत्वाच्या निर्णय काल (ता.१) बदलला. त्याचा फटका पिंपरी-चिंचवडकरांना बसणार आहे. पालिकेत सहा दिवसांचाच आठवडा आहे. पूर्वीचे आयुक्त आठवड्यातील चार दिवस सायंकाळी चार ते सहा या वेळेत हे अभ्यांगत आणि नागरिकांना भेटत होते. अर्जंट काम असेल,तर ते कधीही भेटत असत. पण, पाटील गेले. शेखरसिंह आले. त्यांनी येताच काही अधिकाऱ्यांच्या जबाबदारीत फेरबदल केले. आता थेट नागरिकांशी संबंधित भेटीच्या पूर्वीच्या आदेशातही त्यांनी बदल केला.आठवड्यातील भेटीच्या दिवसांची संख्या चारहून तीनवर कमी केली. ते आता सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत भेटीसाठी उपलब्ध असणार आहेत.

समाधानाची बाब ही की त्यांनी भेटीची वेळ एक दिवसाने कमी केली असली, तरी ती प्रत्येक दिवशी एका तासाने म्हणजे एकूण तीन तासांनी ती वाढवली आहे. महापालिकेशी संबंधित कामकाजाकरीता नागरिक आयुक्तांकडे दररोज मुख्य प्रशासकीय भवनात येतात. कामकाजाची व्याप्ती,प्रसंगानुरूप संबंधित अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यासोबत बैठकांचे आयोजन,अत्यावश्यक काम त्यांच्याकडे यावेळी चालू असते.

## संपादकीय

# त्यांचीही दिवाळी गोड व्हावी..!

***दिवाळी हा भारतातील सर्वात मोठा दिसण म्हणून साजरा केला जातो. श्रीमंतांपासून ते गोरगरिबांपर्यंत सारे जण वर्षभर दिवाळीच्या प्रतीक्षेत असतात.***

भारतीय समाजामध्ये दिवाळीबाबत एक वेगळेच आकर्षण कुतूहल आणि उत्सुकता सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये असते. धार्मिकदृष्ट्या विचार करायचा झाल्यास दिवाळी हा दीपोत्सव म्हणून ओळखला जातो. अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा उत्सव ही दिवाळीची खरी ओळख आहे. अंधार या शब्दाचा केवळ शब्दार्थ येथे लक्षात घेण्यात येऊ नये तर त्यामागील खराब भावार्थ आणि त्याहीपेक्षा म्हणजे त्याचा खूप व्यापक अर्थ आहे, तो समाजातील सर्वच घटकांनी नीट विचारात घेतला तर श्रीमंत आणि मध्यमवर्गीयांबरोबरच तळागाळातील गोरगरिबांची दिवाळी देखील निश्चितच अधिक आनंदात आणि समाधानात साजरी होऊ शकते.

एरवी दिवाळी म्हटली की आपल्याकडे पूर्वीपासून दिवाळीची सुरुवात ही आठदहा दिवस आधीच सुरू होत असते, मग त्यासाठी घराची रंगरंगोटी करणे असो अथवा आताच्या काळाला साजेसे बोलायचे तर घराला नवीन फर्निचर करणे असो अथवा वन बीएचके फ्लॅटऐवजी टू बीएचके फ्लॅट घेणे असो, थ्री बीएचके फ्लॅट घेणे असो, घरासमोर नवीन फोरव्हिलर आणणे असो, अथवा नवनवीन इलेक्ट्रॉनिक्स अत्याधुनिक साधने घरात आणणे असो अशा विविध आधुनिक साधनसामुग्रीने स्वतःच्या कुटुंबाच्या प्रगतीमध्ये भर घालून दिवाळीला अधिक आनंदात साजरे करण्याची परंपरा भारतीयांमध्ये आहे आणि ती निश्चितच कुटुंबासाठी कुटुंबातील आप्तेष्टांसाठी आनंदाचा झरा घेऊन प्रत्येकाच्या घरामध्ये दिवाळी येत असते. जे सरकारी निमसरकारी कर्मचारी आहेत, अधिकारी आहेत, राजकीय नेते आहेत, राजकीय पदाधिकारी आहेत तसेच मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांमधील उच्च अधिकारी वर्ग असेल या सर्वांच्या घरचा दिवाळीचा माहोल खूप काही वेगळा आनंदाचा फील देणारा असतो. नवीन कपडे, घराला, बंगल्यांना नवीन विद्युत रोषणाई, नवीन अलंकार खरेदी अशी खूप काही खरेदी या निमित्याने श्रीमंत आणि मध्यमवर्गीय स्वतःच्या क्षमतेप्रमाणे करत असतात. थोडक्यात, गणपती आणि नवरात्र उत्सव हे जसे समाज एकत्र येऊन साजरे केले जातात.




## आनंदी सकाळ

# विश्वासाचे सक्रिय इच्छा-रूप श्रद्धा

श्रद्धा विश्वासाचे सक्रिय इच्छा-रूप आहे. म्हणून ज्ञानी माणसाला ब्रह्मानंद व ईश्वरत्वाचा साक्षात्कार झाल्यावरही लोकसंग्रहासाठी जास्त सजगपणे, जबाबदारीने अखंड कर्ममग्न व्हावे लागते. श्रद्धा विश्वासयुक्त कर्म ही रूद्राची खरी उपासना आहे. श्रद्धा व विश्वासाचेच एक नाव मूल्यबोध आहे. मूल्यबोध नेहमी विवेकाश्रित असतो. माहितीचा साठा श्रद्धा, भक्ती, धर्म यांच्याशी जोडला गेलेला नसल्यामुळे सर्वत्र वैचारिक दंभ व अराजकता आहे. मतमतांतरांच्या गलबल्यात अनेक प्रश्न, संशय निर्माण झाले आहेत. देहाश्रयी जगण्याच्या मनोवृत्तीमुळे मनाच्या विलक्षण, सूक्ष्म ज्ञानशक्ती निस्तेज बनल्या आहेत. म्हणून अकाल वृद्धत्व व घोर उदासीनता वाढते आहे. हे वैराग्य नसून माणूसपणाचे गोठणे आहे. ते कोणत्याही समाजाला परवडणारे, सहन होणारे नाही.




# मंदीची लाट की नवी पहाट?



सारे जग मंदीच्या तावडीत सापडते आहे. जगभरातील शेअर बाजारांमध्ये गुंतविलेल्या कोट्यवधी डॉलरच्या रकमेचे बाजारमूल्य झपाट्याने घसरते आहे. जगात शेअर बाजाराशी निगडीत परतावा देणारे पेन्शन फंड आक्रसत चालले आहेत. स्वाभाविकच, ज्येष्ठांना मिळणाऱ्या पेन्शनच्या रकमाही उणावत आहेत. जागतिक अर्थकारणात काहीतरी मोठा बिघाड झाला असून तो वाढतच जातो की काय, अशा भीतीने अमेरिका, युरोपसहित अनेक देशांमधील तज्ज्ञांना आणि धोरण नियंत्यांना ग्रासले आहे. चलनवाढ आणि त्यामुळे वाढत चाललेले व्याजदर यांच्या आकड्यांची तुलना करण्यासाठी अनेक देशांना थेट दुसऱ्या महायुद्धापर्यंत मागे जावे लागत आहे. करोना काळात जगातल्या बहुतेक सरकारांनी अर्थकारणात प्रचंड पैसा ओतला. तेव्हा ते गरजेचे होते. मात्र, या वाढत्या पैशाला तोलून धरेल इतकी प्रत्यक्ष आर्थिक वाढ झालेलीच नाही. त्यामुळे, स्वाभाविकच चलनवाढीचा चटका अधिक जाणवतो आहे. साऱ्या जगभरात सरासरी दोन टक्के चलनवाढ असायला हवी, असे जागतिक वित्तसंस्थांनी म्हटले होते. हे ध्येय गाठणे अवघडच नव्हे तर अशक्य बनले आहे. चलनवाढ याचाच अर्थ महागाई. यावर मार्ग म्हणजे जगातल्या सरकारांनी आता केवळ पैशाचे वाटप बंद करून दीर्घकालीन योजनांमध्ये गुंतवणूक करावी, अशी सूचना अर्थतज्ज्ञ करीत आहेत. करोना काळात जगातील बहुतेक सरकारांनी नागरिकांचे प्राण वाचविण्यास प्राधान्य दिले आणि प्रचंड प्रमाणात लोकहिताच्या योजना राबवून नागरिकांच्या हातात अनुदानरूपी पैसा किंवा थेट धान्य वा इतर वस्तू जातील, असे पाहिले. तो काळ आता संपला आहे, असे तज्ज्ञांना वाटते. जगातील कोणत्याही सरकारने आपणच यावच्चंद्रदिवाकरौ राज्य करणार आहोत, अशा भ्रामक समजुतीत राहून 'रेवडी संस्कृती' जोपासू नये, असा इशाराही तज्ज्ञ देत आहेत. या पार्श्वभूमीवर, भारतातील विकास दरातही मूळ अंदाजापेक्षा थोडी घट होण्याची शक्यता असून काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने मोफत धान्य योजना अजून काही महिने चालू ठेवण्याचे ठरविले आहे, याचे स्मरण द्यायला हवे.

उदारीकरण आणि जागतिकीकरण झाल्यापासून कोणताही देश जागतिक अर्थप्रवाहांपासून दूर राहू शकत नाही. भारतही त्यात आला. भारताला असणारा एकच मोठा फायदा म्हणजे, भारताची देशांतर्गत बाजारपेठच प्रचंड मोठी आहे. त्याचप्रमाणे, कितीही औद्योगिकीकरण झाले तरी भारतीय अर्थकारणाला कृषी क्षेत्राचा एक भक्कम आधार आहे. त्यामुळेच, आज जगातील ब्रिटन, अमेरिका, जपान यांच्यासहित अनेक देशांमध्ये विस्कटून जाणाऱ्या आर्थिक घडीबाबत जी चिंता आहे; तितक्या प्रमाणात ती भारतात दिसत नाही. अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा एक निकष नेहेमीच करसंकलन हा असतो. वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी संकलनाचे नवनवे विक्रम होतच आहेत. आता जीएसटी संकलनाचे सरासरी मासिक उत्पन्न दीड लाख कोटींच्या पुढे गेले आहे.

# कैद्यांना जामीन का मिळत नाही?

**'आमचं माणूस जामिनावर कधी सुटेल,' हा एक प्रश्न प्रत्येक फौजदारी कामकाज पाहणाऱ्या वकिलास अंतर्मुख करायला लावणारा ठरतो.**

एक वेळ खटला पूर्ण चालवून आरोपित व्यक्तीची निर्दोष सुटका न्यायालयाकडून मिळवणं सोपं जातं; पण कित्येक गुन्ह्यांमध्ये जामिनावर आरोपित व्यक्तीस तुरुंगाबाहेर काढणं फारच जिकिरीचं होतं. वस्तुतः कुणाही व्यक्तीस पोलिसांकरवी अटक होणे आणि त्या व्यक्तीला गजाआड राहावे लागणे हाच मुळी लोकशाही राज्य की पोलिसी राज्य व्यवस्थेतला संघर्ष मानला जातो. या संबंधांतील प्रक्रियेला गती यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच काही सूचना केल्या आहेत, त्याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.



जगभरात एखाद्या आरोपित व्यक्तीवरचा आरोप न्यायालयात सिद्ध होत नाही, तोपर्यंत ती आरोपित व्यक्ती निर्दोष मानली जावी, हे तत्त्व पाळण्यात येतं. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने दि. १० डिसेंबर, १९४८ रोजी पॅरिसमध्ये भरलेल्या बैठकीत या आशयाचा अनुच्छेद ११ संमत केला; आणि तेव्हापासून जगभर शाबिती होईस्तोवर निर्दोष या तत्त्वाला कायदेशीर अधिष्ठान लाभले. मात्र, तरीही पोलिस यंत्रणा आणि अन्य तपास यंत्रणांच्या मार्फत अनेक आरोपींना अटक होते आणि त्यांना जामीन मिळून तुरुंगाबाहेर पडण्यात अगणित अडचणींना सामोरे जावे लागते.

नुकतेच दि. ११ जुलै, २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने सतेंदर कुमार अंतिल विरुद्ध केंद्रीय तपास यंत्रणा आणि इतर (२०२२ एससीसी ऑनलाईन एससी ८२५) या केसमध्ये भारतीय फौजदारी न्यायप्रणाली, जामीन मिळण्याच्या तरतुदी आणि जामिनामागची पूर्वपीठिका या व इतर अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर विस्तृत विवेचन करणारे निकालपत्र देऊन जामीन प्रक्रियेला गतिशील करण्याचा प्रयत्न केला. खरं तर भारतात फौजदारी प्रक्रिया संहितेत 'जामीन' म्हणजे काय याची नेमकी व्याख्या नाही. मात्र, 'जामीन' म्हणजे नेमके काय, याची जरी व्याख्या कायद्याच्या पुस्तकांत नमूद नसली तरी 'जामीन' म्हणजे न्यायालयाने अटकेत असलेल्या व्यक्तीस पुढील तारखांना हजर राहण्याच्या हमीवर तात्पुरती सुटका करताना घेतलेली हमी किंवा बंधपत्र अशी 'जामिना'ची व्याख्या 'ब्लॅक्स लॉ डिक्शनरी' करते आणि हीच व्याख्या जगमान्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### केवळ सहानुभूतीचे राजकारण सुरू



।मुंबई। महाईन्यूज ।

अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापलेय. दोन्ही गटाकडून आरोप – प्रत्यारोपांचा खेळ सुरु आहे. दरम्यान आज दोन्ही उमेदवारांनी निवडणूक अर्ज दाखल केल्यानंतर भाजपा- शिंदे गट आणि महाविकास आघाडीकडून मोठ्याप्रमाणात शक्तीप्रदर्शन करण्यात येत आहे. दरम्यान या निवडणूकीवरून आदित्य ठाकरेंनी शिंदे गटावर हल्लाबोल केला आहे. ही निवडणूक माणुसकीविरुद्ध खोकासूर अशी टीका आदित्य ठाकरेंनी केली आहे. ज्या आरोपांवर आता शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी पलटवार केला आहे.ही निवडणूक काँग्रेस – राष्ट्रवादी आणि शिवसेना- भाजपा अशी आहे. मुरजी पटेल हे स्थानिक उमेदवार आहेत.

## ऋतुजा लटकेंविरोधात भाजपाचे मुरजी पटेल मैदानात

# ‘महाराष्ट्राला ठाकरेंशिवाय पर्याय नाही’!

## ऋतुजा लटकेंचा शिंदे गट-भाजपाला टोला

।मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखेर ऋतुजा लटकेंचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळी ऋतुजा लटकेंनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री अनिल परब हे देखील उपस्थित होते.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखेर ऋतुजा लटकेंचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळी ऋतुजा लटकेंनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री अनिल परब हे देखील उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर ऋतुजा लटके यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.



त्यावेळी त्यांनी महाराष्ट्रात शिवसेना आणि उद्धव ठाकरेंशिवाय पर्याय नसल्याचं सांगत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपवर टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर ऋतुजा लटके यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्या म्हणाल्या की, “आजच्या दिवसाची सुरुवात मी बाप्पांचे दर्शन घेऊन करत आहे. आज दुपारी 12 वाजेपर्यंत उमेदवारीचा अर्ज भरायचा असल्याने आता मी बीएमसी कार्यालयात राजीमाना स्वीकारल्याचे पत्र घेणार आहे.

**“पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांच्या आशीर्वादाने मी आज अर्ज भरण्यासाठी चाललो आहे. अंधेरी आमचा एक परिवार आहे, येथे सर्वधर्मीय लोक राहतात. अंधेरीची जनता आम्हाला पूर्ण बहुमताने निवडून देईल,” असा विश्वास मुरजी पटेल यांनी व्यक्त केला आहे. “मी भाजपाचा कार्यकर्ता आहे. पक्ष जो आदेश देईल तो मला मान्य आहे. पक्षाने मला निवडणूक लढवण्यास सांगितल्याने मी मैदानात उतरलो आहे. आमच्याबरोबर खरी शिवसेना म्हणजेच एकनाथ शिंदे आहेत. रामदास आठवले यांचा आरपीआय गटही आमच्यासोबत आहे. महायुती म्हणून आम्ही निवडणुकिच्या रिंगणात उतरणार आहोत,” असंही त्यांनी सांगितलं.**

### राज्यपाल नियुक्त 12 आमदारांवरून

# शिंदे-फडणवीस सरकारला सुप्रीम कोर्टाने फटकारले!

## सुनावणी नोव्हेंबरपर्यंत लांबली

।मुंबई। ।महाईन्यूज ।

राज्यपाल नियुक्त विधान परिषदेच्या 12 आमदारांच्या मुद्द्यावरून आज सर्वोच्च न्यायलयाने शिंदे- फडणवीस सरकारला चांगलेच फटकारले आहे. गेल्या तीन वर्षांपासून राज्यपाल नियुक्त 12 आमदारांचा मुद्दा राजकारणात मोठ्याप्रमाणात गाजतोय. यासंदर्भातील शपथपत्र दाखल न केल्याने नोव्हेंबर अखेरपर्यंत राज्यपालांना 12 आमदारांची नियुक्ती रखडली आहे.

राज्यपाल नियुक्त 12 आमदारांच्या निवडीबाबत आज सर्वोच्च न्यायलयात सुनावणी झाली. यावेळी शपथपत्र दाखल न केल्याने सर्वोच्च न्यायलयाने शिंदे – फडणवीस सरकारला चांगले फटकारले आहे. याबाबत राज्यपाल



भगतसिंह कोश्यारी यांची भूमिकाही आज सादर न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे राज्यपाल नियुक्त 12 आमदारांबाबत प्रकरण सुप्रीम कोर्टात नोव्हेंबर मध्यापर्यंत लांबल आहे. विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त 12 आमदारांच्या नियुक्तीबाबत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस दिली होती. त्यानंतरही राज्य सरकारने शपथपत्र दाखल केले नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने शिंदे- फडणवीस सरकारची कानउघडणी केली आहे. मात्र सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे आगामी नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना आमदारांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेता येणार नाही. यामुळे पुढच्या सुनावणीपर्यंत स्थगिती आदेश कायम राहणार आहे. महाविकास आघाडी सरकारने दिलेली यादी मंजूर न केल्याने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात नाशिकमधील रतन सोली लुथ यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले. त्यावरही सुनावणी झाली नसताना महाविकास आघाडी सरकारने दिलेली यादी रद्द करत शिंदे फडणवीस सरकारने नवीन यादी राज्यपालांना पाठवली होती.

# एसटी प्रवाशांचा प्रवास महागणार

## 20 ऑक्टोबरपासून लागू होणार नवे दर

।मुंबई ।महाईन्यूज ।

दिवाळीनिमित्त एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. कारण एसटी महामंडळाने दिवाळानिमित्त आता हंगामी भाडेवाढ जाहीर केली आहे. एसटी महामंडळाच्या परिवर्तनशील भाडेवाढ सुत्रानुसार, गर्दीच्या हंगामात महसुल वाढीच्या दृष्टीने 30 टक्क्यांपर्यंत हंगामी भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटीला दिला आहे. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे या हंगामातही 20 ऑक्टोबर 2022 आणि 21 ऑक्टोबर 2022 रोजीच्या मध्यरात्री 12.00 नंतर प्रवास सुरु करणा-या प्रवाशांना सुधारित 10 टक्के वाढीव दराने भाडे आकारणी करण्यात येईल.

ही भाडेवाढ 31 ऑक्टोबर 2022 पर्यंत राहील. सदर भाडेवाढ



साधी (परिवर्तन), निमआराम (हिरकणी), शिवशाही (आसन) व शयन आसनी बसेसला लागू राहील. शिवनेरी व अश्वमेध या बसेसला ही भाडेवाड लागू राहणार नाही. ज्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केले आहे, त्या प्रवाशांकडून वाहकाव्दारे आरक्षण तिकिट दर व नवीन तिकिट दर यातील फरक घेण्यात येईल. तसेच ही भाडेवाढ एसटीच्या आवडेल तेथे प्रवास तसेच मासिक/त्रैमासिक व विदयार्थी पासेसना लागू करण्यात येणार नाही. 1 नोव्हेंबरपासून भाडेवाढ संपुष्टात येऊन, नेहमीप्रमाणे तिकिट दर आकारले जातील असे एसटी महामंडळाकडून कळविण्यात आले आहे.

यंदा दिवाळीच्या सणात जोडून आलेल्या सुट्ट्या पाहता महामंडळाने दरवर्षी प्रमाणे नियमित बस फेऱ्या बरोबरच प्रवासी गर्दी लक्षात घेऊन 1494 जादा बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.

# हिमाचल प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तारखेची घोषणा

## 12 नोव्हेंबरला मतदान तर 8 डिसेंबरला निकाल

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रीय निवडणूक आयोगाने हिमाचल प्रदेशमधील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत.

निवडणूक आयोगाने दिल्लीतील विज्ञान भवनात पत्रकार परिषद घेत आगामी विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. ज्यानुसार, हिमाचल प्रदेशमध्ये 12 नोव्हेंबरला विधानसभा निवडणुका होणार आहेत. तर 8 डिसेंबरला निकाल जाहीर होणार आहे.

दरम्यान गुजरात आणि हिमाचल प्रदेश या दोन्ही राज्यांमध्ये सध्या भाजपचे सरकार आहे. दरम्यान यंदाच्या गुजरात निवडणुकीत आम आदमी पक्षही रिंगणात उतरला आहे. त्यामुळे ही निवडणुक अधिकच चुरशीची होणार आहे. विधानसभा निवडणुकीची सर्वच पक्षांनी तयारी पूर्ण केली आहे. गेल्या वेळी गुजरातमध्ये दोन टप्प्यात निवडणुका झाल्या होत्या. त्याचवेळी हिमाचल प्रदेशात एकाच टप्प्यात निवडणुका झाल्या. हिमाचल प्रदेशमध्ये 12 नोव्हेंबरला विधानसभा निवडणुका होणार आहेत. तर 8 डिसेंबरला निकाल लागणार आहेत.

2017 मध्ये गुजरात विधानसभेच्या 198 जागांसाठी 2 टप्प्यांत निवडणुका झाल्या.



### हिमाचल प्रदेशातील गेल्या निवडणुकीतील राजकीय स्थिती

**हिमाचल प्रदेशमध्ये नोव्हेंबर 2017 रोजी 68 जागांसाठी विधानसभा निवडणुका झाल्या. यावेळी भाजपला 44, काँग्रेसला 21 जागांवर यश मिळाले, तर तीन जागा इतर पक्षांनी काबीज केल्या. यातील मतांच्या टक्केवारीबद्दल बोलायचे झाल्यास, राज्यात भाजपला एकूण मतांपैकी 48.8 टक्के, तर काँग्रेसला 41.7 टक्के मतं मिळाली आहेत. यात उच्चवर्णीय मतं आपल्या बाजूने आणण्यासाठी काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री वीरभद्र सिंह यांच्या कुटुंबाचा आधार घेतला.**

दरम्यान गुजरात आणि हिमाचल प्रदेश या दोन्ही राज्यांमध्ये सध्या भाजपचे सरकार आहे. दरम्यान यंदाच्या गुजरात निवडणुकीत आम आदमी पक्षही रिंगणात उतरला आहे. त्यामुळे ही निवडणुक अधिकच चुरशीची होणार आहे. विधानसभा निवडणुकीची सर्वच पक्षांनी तयारी पूर्ण केली आहे. गेल्या वेळी गुजरातमध्ये दोन टप्प्यात निवडणुका झाल्या होत्या. त्याचवेळी हिमाचल प्रदेशात एकाच टप्प्यात निवडणुका झाल्या. हिमाचल प्रदेशमध्ये 12 नोव्हेंबरला विधानसभा निवडणुका होणार आहेत. तर 8 डिसेंबरला निकाल लागणार आहेत.

# मुसळधार पावसामुळे सिक्कीममध्ये भूस्खलन

## जवळपास 550 पर्यटक अडकले



। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशाच्या अनेक भागात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. या मुसळधार पावसाचा फटका सिक्कीमला बसला आहे. सिक्कीममध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात 550 पर्यटक अडकले आहेत. पर्यटक अडकल्याची माहिती मिळताच घटनास्थळी स्ट्रायकिंग लायन डिव्हिजनच्या तुकड्यांकडून त्यांना मदत केली जात आहे.

सिक्कीममध्ये पहाटेपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसामुळे राजधानी गंगटोक आणि त्याच्या लगतच्या भागातील पाणीपुरवठ्यावर खंडीत झाला आहे. तसेच उत्तर सिक्कीम जिल्ह्यातील विविध ठिकाणी रस्ता खराब झाल्याने पर्यटक अडकले आहेत. त्यामुळे जवळपास 550 पर्यटक अडकले. या पर्यटकांची माहिती मिळताच घटनास्थळी स्ट्रायकिंग लायन डिव्हिजनच्या तुकड्यांकडून मदत केली जात आहे. पर्यटकांना जेवन,पाणी पुरवण्यात येत असून, ज्या पर्यटकांची प्रकृती ठीक नाही अशा पर्यटकांपर्यंत औषधे पोहोचवण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिक्कीममधील हवामान अद्यापही खराबच आहे. अडकलेल्या पर्यटकांना सातत्याने सुरक्षेबाबत माहिती दिली जात आहे. राज्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भूस्खलन झाले आहे.

# कर्जात बुडालेला मच्छीमार क्षणात झाला लखपती

### केरळमधील मच्छीमाराचं नशीब कसं पालटलं...

। कीव्ह (युक्रेन) । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



केरळमधील एका मच्छीमाराच्या नशिबाची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे. कर्ज थकवल्याप्रकरणी बँकेची घरावर जप्तीची नोटीस आल्याने निराश झालेल्या मच्छीमाराचे नशीब अवघ्या काही तासात पालटले. कर्ज चुकवण्याच्या विवंचनेत असलेल्या या मच्छीमाराला तब्बल ७० लाखांची लॉटरी लागली आहे. राज्य सरकारची 'अक्षया' लॉटरी लागल्याने कर्जात बुडालेल्या मच्छीमाराला दिलासा मिळाला आहे. पोकुंजू, असे या मच्छीमाराचे नाव आहे. १२ ऑक्टोबरला नेहमीप्रमाणे मच्छीमारी करण्यासाठी पोकुंजू घराबाहेर पडले होते. दुपारी घरी परतल्यावर बँकेने घराच्या जप्तीची नोटीस पाठवल्याचे ऐकताच त्यांना धक्का बसला. "बँकेकडून नोटीस मिळाल्यानंतर आम्ही निराश झालो होतो. आता घर विकावं लागणार का? किंवा कर्जाबाबत आणखी काही करता येईल का? या विवंचनेत आम्ही होतो. मात्र, जेव्हा ही लॉटरी लागल्याचे कळले तेव्हा सुखद धक्का बसला", अशी भावना मच्छीमाराच्या पत्नीने व्यक्त केली आहे. पोकुंजू यांनी घरासाठी बँकेकडून नऊ लाखांचं कर्ज घेतलं होतं.

# "ब्रिटिशांनी सुद्धा..." पराठ्यांवर १८ टक्के जीएसटी लावल्यानं अरविंद केजरीवाल संतापले

## महागाईवरुन भाजपाला फटकारलं!

। गुवाहाटी । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गुजरातमध्ये सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या राज्यात भाजपाला आव्हान देण्यासाठी आम आदमी पक्षानं कंबर कसली आहे. त्यातच गुजरातमध्ये पराठ्यांवर १८ टक्के जीएसटी लावल्यानंतर भडकलेले आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी भाजपाचा समाचार घेतला आहे. ब्रिटिशांनी सुद्धा खाद्यपदार्थांवर कर लावला नव्हता, असे म्हणत केजरीवाल यांनी भाजपा सरकारला फटकारलं आहे. "केंद्र सरकारकडून आकारला जाणारा जास्त जीएसटी देशातील महागाईचं मुख्य कारण आहे. हा जीएसटी कमी करून जनतेची महागाईतून सुटका करण्यात यावी", असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. 'गुजरात अॅपीलेट ॲथॉरिटी ऑफ अडवाँस रुलिंग'ने (GAAAR) गुरुवारी पराठ्यांवरील १८ टक्के जीएसटी मंजूर केला आहे. 'जीएएआर'च्या विवेक रंजन आणि मिलिंद तोरावणे यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाने पराठे साधी चपाती किंवा पोळीपासून वेगळे असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे पराठे चपात्यांच्या श्रेणीत मोडले जात नसल्याचे सांगत यावर १८ टक्के जीएसटी लागू करण्यात आला आहे.

'जीएएआर'चं म्हणणं काय?



### अहमदाबादेतील कंपनीचा 18 टक्के जीएसटीला विरोध

**अहमदाबादेतील 'वाडीलाल इंडस्ट्रीज' या कंपनीने पराठ्यांवरील १८ टक्के जीएसटी कमी करण्याबाबत याचिका दाखल केली होती. ही कंपनी आठ प्रकारचे फ्रोजन पराठे तयार करते. चपाती आणि पराठे दोन्ही पिठापासून तयार होत असल्यानं यात जास्त अंतर नसल्याचे मत कंपनीने नोंदवलं होतं. त्यामुळे पराठ्यांवर १८ टक्क्यांऐवजी पाच टक्के जीएसटी आकारण्यात यावा, अशी मागणी कंपनीकडून करण्यात आली होती. मात्र, 'जीएएआर'ने कंपनीची मागणी फेटाळत पराठ्यांवर १८ टक्के जीएसटी कायम ठेवला आहे.**

# "चित्रपट असो किंवा लग्न मुलगी कायम... " हुमा कुरेशीने खंत व्यक्त केली

'गँग्स ऑफ वासेपूर' चित्रपटातून आपली ओळख निर्माण करणारी अभिनेत्री म्हणजे हुमा कुरेशी. मूळची दिल्लीची असून नाटकांमधून तिने काम करण्यास सुरवात केली. अभिनयनात करियर करण्यासाठी तिने २००८ साली मुंबई गाठली. तिचे वडील हॉटेल व्यवसायात असून तिचा भाऊ साकिब सलीमदेखील अभिनय क्षेत्रात आहे. हुमाने काही वर्षातच आपल्या अभिनयनाने प्रेक्षकांची मनं जिंकली. 'डेढ इश्किया', 'बदलापूर' 'एक थी डायन' या चित्रपटांमधून काम केले आहे. तिने 'महारानी' या वेबसीरिजमध्ये काम केले आहे. तिचा आगामी चित्रपट 'डबल एक्सएलचा' ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. डबल एक्सएल' हा चित्रपट बॉडी शेमिंगसारख्या विषयावर भाष्य करणारा आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने माध्यमांशी बोलताना हुमाने सांगितले की चित्रपट असो किंवा लग्न जुळणाऱ्या वेबसाईट प्रत्येक ठिकाणी मुलगी सडपातळ, गोरी आणि सुंदर हवी असते, मुलगा कसाही असो. जेव्हा मी चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरवात केली तेव्हा माझ्या चित्रपटाचे समीक्षण करताना कोणीतरी लिहले होते हुमा कुरेशी सुंदर दिसते, परंतु मुख्य प्रवाहातील नायिकेसाठी तिचे वजन ५ किलो जास्त आहे. त्या समीक्षणातील ओळींनी माझे हृदय चिरल्यासारखे झाले होते. सोनाक्षी सिन्हा आणि हुमा कुरेशी या चित्रपटातून लठ्ठ महिलांची कहाणी प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत आहेत. ज्या आपली स्वप्न पूर्ण करू इच्छितात. सतराम रमानी यांच्या दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटात लठ्ठ महिलांसंबंधी असलेल्या काही समस्या आणि गैरसमजांवर भाष्य केलं जाणार आहे. याच चित्रपटात शिखर धवन पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसणार आहे.



# कोणत्या पक्षातून राजकारणात प्रवेश करशील?

शेरशहा चित्रपटातील भूमिकेसाठी अभिनेत्री कियारा अडवाणी हीचं विशेष कौतुक झाले. याच चित्रपटाच्या भूमिकेसाठी अभिनेत्री कियारा अडवाणी हिला 'महाराष्ट्रीयन ऑफ द इयर' पुरस्काराचा देण्यात आला आहे. या पुरास्कार सोहळ्यात कियारा अडवाणी हिने केलेलं वक्तव्य सध्या चर्चेत आलं आहे.अभिनेत्री कियारा अडवाणी म्हणाली, मी मुंबईत जन्मले. याच शहरात वाढले. मुंबई हे माझं घर आहे; म्हणून या मराठी पुरस्काराचं मोल माझ्यासाठी खूप आहे, अशी कृतज्ञ भावना कियाराने व्यक्त केली. 'वर्षभरात बॉलिवूड मधील चित्रपट फ्लॉफ ठरत असतानाच, बॉलिवूडला अनेक धक्के बसत असताना 'शेरशहा', 'भूलभुलैय्या' आणि 'जुग जुग जियो' हे कियाराचे तीन चित्रपट सुपरहीट ठरले होते. यावरच बोलताना कियारा म्हणाली, परमेश्वराची कृपा आणि प्रेक्षकांचं प्रेम!... ते असंच कायम राहू दे माझ्यावर! दरम्यान लोकमत वृत्तपत्र समुहाचे चेअरमन विजय दर्डा यांनी कियाराला प्रश्न विचारला, 'समजा तुला राजकारणात प्रवेश करायचा असेल, तर तू कुणाच्या पक्षात जाशील?'



# ऋतिकने पहिल्यांदाच शेअर केला सबासोबतचा फोटो



बॉलिवूड अभिनेता ऋतिक रोशन सध्या त्याच्यापेक्षा वयाने 12 वर्ष लहान असणाऱ्या अभिनेत्री आणि गायिका सबा आझादला डेट करत आहे. काही महिन्यांपूर्वीच यांच्या रिलेशनशिपला सुरुवात झाली. एका डिनर डेटवर दोघे पहिल्यांदा एकत्र दिसून आले होते. त्यानंतर वारंवार दोघेही अनेक पार्टी आणि फंक्शनमध्ये एकत्र दिसून येतात. दरम्यान, इतक्या दिवसानंतर ऋतिक रोशनने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर सबा आझादसोबतचा पहिला फोटो शेअर केला आहे. जो आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. ऋतिक रोशनने नुकताच शेअर केलेला सबा आझादसोबतचा फोटो लंडन ट्रीपमधील असून यामध्ये सबा एका बेंचवर लहान मुलांप्रमाणे बसलेली दिसत आहे. हा फोटो शेअर करत ऋतिकने खाली कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'गर्ल ऑन ए बेंच', समर 2022, लंडन'. याचं फोटोवर सबा आझादने देखील मजेशीर कमेंट केली ..

# बॉलिवूडमधील डावपेच



रणबीर कपूरच्या चित्रपटातून बॉलिवूड पदार्पण करणारी नरगिस फाखरी सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. नरगिस फाखरीचा बॉलिवूडमध्ये कोणीही गॉडफादर नाही. त्यामुळे बॉलिवूडमध्ये करिअर करणं नरगिससाठी सोपं नव्हतं. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने बॉलिवूडमधील तिचा आतापर्यंतचा प्रवास आणि इथलं वातावरण यावर भाष्य करत नाराजी व्यक्त केली. चित्रपटसृष्टी पदार्पण केलं तेव्हा ती खूप प्रामाणिक होती त्यामुळे ती समजूतदार नाही असं म्हटलं जायचं. या मुलाखतीत नरगिसने तिच्या आतापर्यंतच्या बॉलिवूड प्रवासावर भाष्य केलं.

नरगिस फाखरीने 'रॉकस्टार' चित्रपटातून बॉलिवूड पदार्पण केलं होतं. त्यानंतर तिने 'मैं तेरा हीरो', 'मद्रास कैफे', 'हाउसफुल 3' या चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय तिने 'स्पाय' या चित्रपटातून हॉलिवूड पदार्पणही केलं. पण यानंतर ती तिच्या कुटुंबासह अमेरिकेला शिफ्ट झाली. बराच काळ चित्रपटसृष्टीपासून दूर राहिल्यानंतर नरगिस पुन्हा एकदा बॉलिवूडमध्ये कमबॅक करण्यास तयार आहे. पण तिला काही खास अशी स्क्रिप्ट मिळत नाहीये अशी खंत तिने या मुलाखतीत व्यक्त केली आहे. या मुलाखतीत नरगिस म्हणाली, "मला या डावपेचांच्या कल्चरची काहीच माहिती नव्हती. मी माझ्या भावनांबद्दल खूप प्रामाणिक होते. मी खूपच प्रामाणिक आहे असं मला अनेकदा सांगितलं जायचं. जे या क्षेत्रासाठी चांगलं नाही. जरी तू त्या लोकांसह कम्फर्टेबल नसलीस तरीही तू त्यांच्याशी बोल असं सांगितलं जायचं. मला डावपेच खेळण्याची सवय नाही. पण मला तेही करण्यास सांगितलं गेलं होतं. मी समजूतदार नाही असं बोललं गेलं होतं. जेव्हा सलग ८ वर्षे काम करून मला कुटुंबासाठी वेळ उरत नव्हता तेव्हा मी ब्रेक घेतला. तणावामुळे मी आजारी पडू लागले होते."

नरगिसने सांगितलं की, तिला सातत्याने आरोग्याशी संबंधीत समस्या येत होत्या. ती डिप्रेशनमध्ये होती. ती म्हणाली, "माझ्याबरोबर जे काही घडत होतं त्याने मी खूप दुःखी होते. मी स्वतःलाच प्रश्न करायचे की, जर मला दुःख होतंय तर मी इथे का आहे.

## शॉर्ट न्यूज »

### बार्सिलोना-इंटर सामना बरोबरीत

।जिनेव्हा। महाईन्यूज

आघाडीपटू रॉबर्ट लेवांडोवस्कीच्या दोन गोलच्या बळावर बार्सिलोनाने 'युएफा' चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या लढतीत पिछाडीवरून इंटर मिलानला ३-३ अशा बरोबरीत रोखले. मात्र, या निकालानंतरही बार्सिलोनाचे आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपले आव्हान कायम राखण्यासाठी बार्सिलोनाने उर्वरित दोन्ही सामने जिंकणे आणि इंटरने गुण गमावणे गरजेचे आहे. इंटरविरुद्ध उस्मान डेम्बेलेने (४०व्या मिनिटाला) गोल करत बार्सिलोनाला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रात निकोलो बारेला (५०व्या मि.) आणि लॉटारो मार्टिनेझ (६३व्या मि.) यांनी गोल केल्यामुळे इंटरने २-१ अशी आघाडी मिळवली. ८२व्या मिनिटाला लेवांडोवस्कीने बार्सिलोनाकडून बरोबरीचा गोल झळकावला. यानंतर रॉबिन गोसेन्सने (८९व्या मि.) गोल करत इंटरला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, भरपाई वेळेत लेवांडोवस्कीने पुन्हा गोल केल्यामुळे बार्सिलोनाने हा सामना बरोबरीत सोडवला.

# टी20 विश्वचषकापूर्वी पाकिस्तानने दाखवली ताकद

## न्यूझीलंडला त्यांच्याच घरात हरवून जिंकली तिरंगी मालिका

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाला टी२० विश्वचषकापूर्वी बूस्टर डोस मिळाला आहे. त्याने यजमान न्यूझीलंडचा ५ गडी राखून टी२० तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात पराभव केला. मात्र, बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान या दोघांनाही या सामन्यात मोठी खेळी करता आली नाही. मोहम्मद नवाजने पुन्हा एकदा सुरेख खेळी करत ३८ धावांवर नाबाद राहिला. या सामन्यात प्रथम खेळताना न्यूझीलंडने ७ गड्यांच्या मोबदल्यात निर्धारित २० षटकात १६३ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानने १९.३ षटकात ५ गडी राखून लक्ष्य गाठले. टी२० विश्वचषक २०२२चे सामने १६ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत.

लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार बाबर आझम १४ चेंडूत १५ धावा करून फिरकीपटू मिचेल ब्रेसवेलचा बळी ठरला. शान मसूदनेही २१ चेंडूत १९ धावा केल्या. दरम्यान, शानदार फॉर्मात असलेला यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवानने २९ चेंडूत ३४ धावा केल्या त्याला लेगस्पिनर ईश सोधीने बाद केले. हे दोघे बाद झाल्यानंतर पाकिस्तानचा संघ अडचणीत सापडला होता. यानंतर मोहम्मद नवाज आणि हैदर अली यांनी दमदार भागीदारी रचत संघाचा विजय निश्चित केला. ७४ धावांत ३ गडी बाद झाल्यानंतर मोहम्मद नवाज आणि हैदर अली यांनी २६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी करत संघाला विजयी मार्गावर नेले. तर ३ चौकार आणि २ षटकार मारत हैदर अलीने १५ चेंडूत ३१ धावा केल्या. त्याचा स्ट्राइक रेट २०७ होता. दुसरीकडे, अष्टपैलू नवाजने २२ चेंडूत ३८ धावा करत तो शेवटपर्यंत नाबाद राहिला. १७३ च्या स्ट्राइक रेटने २ चौकार आणि ३ षटकार मारत संघाला विजय मिळवून दिला. आसिफ अली एक धाव काढून बाद झाला. संघाला विजयासाठी शेवटच्या ३ षटकात २३ धावा करायच्या होत्या.

ट्रेंट बोल्टने १८व्या षटकात १२ धावा दिल्या. याच षटकाने पाकिस्तान सामन्यात आला आणि आता केवळ १२ चेंडूत ११ धावा हव्या होत्या. टीम साऊदीने १९व्या षटकात ७ धावा दिल्या. शेवटच्या षटकात त्यांना विजयासाठी ४ धावा करायच्या होत्या. टिकनरच्या पहिल्या ३ चेंडूंवर पाकिस्तानने आवश्यक धावा केल्या. इफ्तिखार अहमद १४ चेंडूत २५ धावा करून तो नाबाद राहिला. त्याने एक चौकार आणि एक षटकार मारत नवाजसोबत २० चेंडूत ३६ धावांची नाबाद भागीदारी केली.

# बीसीसीआयची मोठी घोषणा! टी२० विश्वचषकात बुमराहच्या जागी मोहम्मद शमीची निवड

**सिल्हेट । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



आगामी टी२० विश्वचषकासाठी भारतीय क्रिकेट मंडळाने (बीसीसीआयने) मोठी घोषणा केली. जसप्रीत बुमराहच्या जागी अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीची निवड करण्यात आली. दुखापतीमुळे आधीच भारताला मोठा धक्का बुमराहच्या रूपाने बसला होता आणि शमी देखील कोरोनामुळे आजारी असल्याने ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका मालिकेत सहभागी होऊ शकला नव्हता. पण आजारातून बरा झाल्यानंतर त्याने सराव करण्यास सुरुवात केली. जसप्रीत बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. अशात या बातमीने भारतीय संघासोबतच चाहत्यांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. बीसीसीआयने ट्वीट करत याची माहिती दिली आहे. मोहम्मद शमी याने मागील काही दिवसांपूर्वीच राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए) म्हणजेच एनसीएमध्ये फिटनेस चाचणी पास केली होती. बुधवारी १२ ऑक्टोबरला मोहम्मद शमी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला. भारतीय संघात जखमी जसप्रीत बुमराहला स्थान देण्यात आले आहे. शमीचे नाव यापूर्वी टी२० विश्वचषक संघाच्या राखीव यादीत समाविष्ट होते, परंतु पाठीच्या दुखापतीमुळे बुमराह या मोठ्या स्पर्धेतून बाहेर पडला होता. त्यामुळे या अनुभवी वेगवान गोलंदाजासाठी दरवाजे उघडले. बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे दुखापतग्रस्त जसप्रीत बुमराहच्या जागी अनुभवी मोहम्मद शमीची संघात निवड झाल्याची घोषणा केली. आयसीसीकडे बदली खेळाडूचे नाव देण्याची शेवटची तारीख ही १५ ऑक्टोबर होती. त्याच्या एक दिवस आधी बीसीसीआयने आपल्या संघातील बदल जाहीर केला.

"भारतीय वरिष्ठ संघ निवडसमितीने आयसीसी टी२० विश्वचषकासाठीच्या संघातील जसप्रीत बुमराहची बदली खेळाडू म्हणून वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीची निवड केली आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही